ePaper
| वर्ष - 7 । अंक -54 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | मंगळवार, दि. 20 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## सगळे खोके कुठे गेले हे एक दिवस जनतेसमोर यईल: एकनाथ शिंदे



### आतील पानांत

- पवना धरणातून गाळ काढला; साठवणक्षमतेत वाढ!
- सेवा, सुशासन व गरीब कल्याणासाठी भाजपाचे महा-जनसंपर्क अभियान

# भाजपचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्षपद भोसरीकडेच राहणार की चिंचवडला?

## » 'मोदी @9' या भाजपच्या देशव्यापी मोहिमेमुळे या नेमणुका रखडल्या

### » भाजपमध्ये एकमत न झाल्याने हा निर्णय आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेणार




### नेमणुकांना आता पुन्हा ब्रेक

» दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या केंद्रातील सरकारला नऊ वर्षे पूर्ण होत असल्याने भाजपने देशभर सुरु केलेल्या 'मोदी @9' या मोहिमेमुळे या नेमणुकांना आता पुन्हा ब्रेक लागला आहे. ही मोहीम ३० जूनपर्यंत चालणार आहे. जिल्हाध्यक्ष त्यापूर्वी नियुक्त केले, तर त्यांची कार्यकारिणी तयार होण्यास वेळ जाईल. परिणामी या मोहिमेला अडथळा निर्माण होईल. त्यातून या नेमणुका पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत.

**।पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**राज्य मंत्रीमंडळ विस्ताराप्रमाणे भाजपच्या राज्यातील जिल्हाध्यक्ष नियुक्त्याही आता रखडल्या असून त्यासाठी तारीख पे तारीख दिली जात आहे. 'मोदी @9' या भाजपच्या देशव्यापी मोहिमेमुळे या नेमणुका रखडल्याचे कारण आता देण्यात आले आहे. दरम्यान, या नेमणुकीविषयी पिंपरी-चिंचवडमध्ये मोठे औत्सुक्य आहे. कारण हे पद भोसरीकडेच राहणार की चिंचवडला जाणार यावर पैजा लागल्या आहेत.**

जिल्हाध्यक्ष निवडीपूर्वी त्या-त्या जिल्ह्यात पक्ष निरीक्षक जाऊन तेथील पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी अध्यक्ष निवडीबाबत चर्चा करतील, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रदेश कार्यकारिणी जाहीर झाल्यानंतर सांगितले होते.

त्यानुसार भाजपचे पिंपरी-चिंचवड निरीक्षक आणि प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी पिंपरी-चिंचवडचा दौरा केला. त्यांनी पक्षाचे शहर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या शहराध्यक्ष निवडीबाबतच्या भावना जाणून घेतल्या. हा आढावा अहवाल प्रदेशाध्यक्षांना सादरही केला आहे.

मात्र, पिंपरी-चिंचवडसह राज्यातील आठ-दहा जिल्ह्यांचे अध्यक्ष बदलायचे की त्यांनाच किमान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होईपर्यंत कायम ठेवायचे, यावर भाजपमध्ये चर्चा सुरु आहे. त्यावर एकमत न झाल्याने हा निर्णय आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे घेणार आहेत. भाजपची जंबो राज्य कार्यकारिणी ५ मे रोजी जाहीर झाल्यानंतर राज्यातील जिल्हाध्यक्ष १५ मे व नंतर २० मे पर्यंत जाहीर होतील, असे सांगण्यात आले होते. पण, भाजपचे अध्यक्ष जे.पी.नड्डा यांचा महाराष्ट्र दौरा आणि त्यासाठी तयारीच्या बैठकांचे सत्र यामुळे जिल्हाध्यक्षांच्या नियुक्त्यांची ही डेडलाईन हुकली. नंतर मे च्या शेवटचे व नंतर जुनचे अनेक मुहूर्त दिले गेले. पण, ते ही चुकले.

---

# मुख्यमंत्री शिंदेंचा दौरा अन् पिंपरी-चिंचवडकरांच्या तोंडचं पाणी पळालं !

## » अधिकारी दौऱ्यात व्यस्त, दिवसाआड पाणीपुरवठ्यावर परिणाम

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शुक्रवारी (ता. १६) पिंपरी-चिंचवडच्या दौऱ्यावर होते. यावेळी यावेळी त्यांच्या हस्ते 'शासन आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत दाखले वाटप आणि बसवेश्वर महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. मुख्यमंत्र्यांच्या या दौऱ्यात पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन दिवसभर व्यस्त होते. याचा परिणाम शहरातील पाणी वितरणावर झाला. शहरवासियांना दिवसाआड मिळणारे पाणीही शुक्रवारी मिळाले नाही. त्याचा त्रास नागिरकांना सहन करावा लागला.**



महापालिकेत भाजपची सत्ता २०१७ ला आल्यानंतर पिंपरी-चिंचवडमध्ये २५ नोव्हेंबर २०१९ पासून दिवसाआ़ड पाणीपुरवठा सुरु झाला. तो अद्याप कायमच आहे. गुरुवारी (ता.१५) त्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी शट डाऊन घेण्यात आला होता. त्यामुळे शहराचा पाणीपुरवठा बंद राहिला. टर्ननुसार शहराच्या काही भागात गुरुवारी पाणी येणार होते. मात्र, या शट डाऊनमुळे ते आले नाही.

मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यात व्यस्त असल्याने अधिकाऱ्या शुक्रवारीही पाणी पुरवठा करता आला नाही. यामुळे पाण्याअभावी रहिवाशांचे प्रचंड हाल झाले. त्यासाठी विचारणा करण्यासाठी अधिकाऱ्यांना नागरिकांनी फोन केले. मात्र त्यांना प्रतिसादच मिळाला नाही. सध्या प्रशासकीय कारभार असल्याने नगरसेवकांनाही फोन करुन उपयोग झाला नाही. दुसरीकडे त्यांचेही फोन पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी घेतले नाहीच. संपूर्ण पालिका प्रशासन हे आजच्या मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यात व्यस्त राहिल्याने शहरवासियांना रात्री उशीरापर्यंतह पाणी मिळालेले नव्हते. त्यामुळे अगोदरच दिवसाआड पाण्यामुळे होत असलेल्या त्यांच्या हालात आणखी भर पडली. या प्रकारामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

# पवना धरणातून गाळ काढला; साठवणक्षमतेत वाढ!

## » पवना धरणातून काढला 15 हजार क्युबिक मीटर गाळ; पाणीसाठ्यात मोठी वाढ

### » शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या पुढाकारातून दरवर्षी काढला जातोय गाळ

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडकरांची तहान भागविणाऱ्या पवना धरणातील १५ हजार क्युबिक मीटर गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठ्यात वाढ होईल, असा विश्वास शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केला. पवना धरणातून पिंपरी-चिंचवड, मावळमधील गावे आणि शेतीला पाणीपुरवठा केला जातो. पवना धरणाचे काम १९७२ मध्ये पूर्ण झाले. धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचला होता. त्यामुळे धरणातील पाणी साठवणक्षमता कमी होता. पिंपरी-चिंचवडकरांची तहान भागविणाऱ्या पवना धरणातील १५ हजार क्युबिक मीटर गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठ्यात वाढ होईल, असा विश्वास शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केला.**



पवना धरणातून पिंपरी-चिंचवड, मावळमधील गावे आणि शेतीला पाणीपुरवठा केला जातो. पवना धरणाचे काम १९७२ मध्ये पूर्ण झाले. धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचला होता. त्यामुळे धरणातील पाणी साठवणक्षमता कमी झाली होती. त्यामुळे खासदार बारणे यांनी पुढाकार घेत गाळ काढण्यास सुरुवात केली. गेल्या सात वर्षांपासून दर वर्षी उन्हाळ्यात धरणातील गाळ काढला जातो. या वर्षी आतापर्यंत १५ हजार क्युबिक मीटर गाळ काढण्यात आला आहे. या धरणातून आतापर्यंत ७६ हजार क्युबिक मीटर गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे धरणातील साठवणक्षमतेत वाढ झाली आहे. याबाबत खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, की पावसाळ्यात पवना धरणात आजूबाजूच्या डोंगरातून मोठ्या प्रमाणात गाळ येतो. त्यामुळे धरणातील गाळ काढण्याचे काम हाती घेतले. शासकीय यंत्रणेची मदत न घेता सामाजिक संस्था, स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांच्या मदतीने गाळ काढला जात आहे. मागील सात वर्षांत धरणातून ७६ हजार क्युबिक मीटर गाळ काढला आहे.

> ”पवना धरणातील गाळ काढण्याचे काम मागील सात वर्षांपासून चालू आहे. पिंपरी-चिंचवड शहर, तळेगाव दाभाडे, एमआयडीसीच्या क्षेत्राला धरणातून पाणीपुरवठा केला जातो. पावसाळ्यात या धरणात आजुबाजूच्या डोंगरातून मोठ्या प्रमाणात गाळ येतो. त्यामुळे पाणी साठण्यास अडथळा निर्माण होत होता. त्यापार्श्वभूमीवर सात वर्षांपासून धरणातील गाळ काढण्याचे काम हाती घेतले. कोरोनामुळे दोन वर्ष गाळ काढला नाही. यंदा पुन्हा परवानगी घेऊन गाळ काढण्याचे काम सुरु आहे. धरणातील पाणीसाठा वाढविण्यासाठी कोणत्याही शासकीय यंत्रणेची मदत न घेता सामाजिक संस्था, स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांच्या मदतीने गाळ काढला जात आहे. मागील सात वर्षात धरणातून 76 हजार क्युबिक मीटर गाळ काढला आहे.”.
>
> **- श्रीरंग बारणे,** खासदार

### खासदार श्रीरंग बारणे यांचा पुढाकार...

**» पवना नदीपासून पिंपरी-चिंचवड शहरापर्यंत नदीत येणारे नाले आणि नदीत मिसळणारे अशुद्ध पाणी थेट नदीत येऊ नये यासाठी एसटीपी प्लांट बसविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्या पाण्यावर प्रक्रिया करूनच ते नदीत सोडले जावे, यासाठी खासदार श्रीरंग बारणे सातत्याने संबंधित कंपन्या आणि प्रशासनाकडे पाठपुरावा करीत आहेत. खासदार श्रीरंग बारणे हे पवना नदीच्या स्वच्छतेसाठी चांगले काम करत असल्याचा उल्लेख मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेरगाव येथे शासन आपल्या दारी या उपक्रमात बोलताना केला होता.**

---

# सेवा, सुशासन व गरीब कल्याणासाठी भाजपाचे महा-जनसंपर्क अभियान

## » राज्य सरकारच्या योजनांचे लाभ : काळेवाडीत लाभार्थी मेळावा संपन्न

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारताते कर्तृत्ववान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला ९ वर्षे पुर्ण झाली आहेत. त्यानिमित्त मोदी सरकारचे ऐतिहासिक निर्णय, विकास कामे व जनहितार्थच्या योजना यांची माहिती जनतेपर्यंत पोहचावी, याकरिता देशभरातील सर्व लोकसभा मतदारसंघांमध्ये महा-जनसंपर्क अभियान (30 मे ते 30 जुन दरम्यान) मोदी@9 चे कार्यक्रम सुरू आहेत. याच अभियानाचा एक भाग असलेले मोदी@9 अंतर्गत मावळ लोकसभा मतदारसंघातील चिंचवड, पिंपरी व मावळ विधानसभेतील केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचे लाभ मिळालेल्या “लाभार्थी मेळावा काळेवाडी येथिल ‘आरंभ बँक्वेट हॉल’ मध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला.**



यावेळी, प्रधान मंत्री आवास योजना, घरकुल योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, प्रधानमंत्री जन-धन योजना, प्रधानमंत्री किसान सम्मान निधि योजना, आयुष्मान भारत योजना, आत्मनिर्भर भारत रोजगार योजना, अटल पेंशन योजना यासह विविध योजनांची माहिती देण्यात आली. यावेळी ५५० लाभार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते.

राज्याचे माजी मंत्री व मोदी@9 चे मावळ लोकसभेचे संयोजक बाळा भेगडे यांनी उपस्थित लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेशदादा लांडगे, माजी राज्यसभा खासदार व भाजपा प्रदेश उपाध्यक्ष अमर साबळे, चिंचवड विधानसभा प्रभारी व माजी नगरसेवक शंकर जगताप, आण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष अमित गोरखे, माजी महापौर माई ढोरे, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिवराव खाडे, मावळ लोकसभा लाभार्थी संयोजक व माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेवराव ढाके, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख काळूराम बारणे, सरचिटणीस ॲड.मोरेश्वर शेडगे,व राजु दुर्गे, भाजपा

### सिंहगड रोड पोलिसात मिसिंगची तक्रार

**» दर्शना ही त्याचा मित्र राहुल दत्तात्रय हांडोरे हिच्यासोबत सिंहगड आणि राजगड याठिकाणी फिरण्यासाठी गेली आहे. हे दोघेही संपर्कात नाहीत आणि माघारी देखील आलेले नाहीत. म्हणून त्यांनी सिंहगड रोड पोलिसात मिसिंगची तक्रार दिली.**

# राष्ट्रवादीच्या सुलक्षणा शिलवंत यांना विधानसभेची ‘लॉटरी’!

## आ. अण्णा बनसोडे यांना पक्षांतर्गत विरोध

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पिंपरी विधानसभा मतदार संघातील आमदार अण्णा बनसोडे यांनी शिवसेनेशी (शिंदे गट) जवळीक साधली असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालय भेटीनंतर बनसोडे २०२४ ला ‘धनुष्यबाण’ हातात घेणार, असे चित्र निर्माण झाले आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या तिकीटासाठी दावेदार असलेल्या माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत यांना उमेदवारीची ‘लॉटरी’ लागण्याची शक्यता आहे.**






मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर असताना आमदार अण्णा बनसोडे यांच्या कार्यालयाला भेट दिली. यापूर्वी, मुख्यमंत्री व बनसोडे यांचा एकत्रित वाहन प्रवाससुद्धा चर्चेत आला होता. मात्र, विधानसभा निवडणुकांपूर्वी बनसोडे यांची शिवसेनेशी वाढलेली जवळीक आगामी राजकारणाची दिशा ठरवणारी आहे. पिंपरी विधानसभा मतदार संघ राखीव असून, यापूर्वी ॲड. गौतम चाबुकस्वार यांनी या मतदार संघात शिवसेनेच्या तिकीटावर अर्थात ‘धनुष्यबाण’ चिन्हावर विजय मिळवला होता. मतदार संघात भाजपापेक्षा भाजपाविरोधी मतदारांची संख्या मोठी आहे. त्यामुळे भाजपाऐवजी ‘महायुती’चा उमेदवार म्हणून आमदार बनसोडे ‘धनुष्यबाण’ चिन्हावर निवडणूक लढवतील. जागा वाटपामध्ये चिंचवड आणि भोसरी मतदार संघ भाजपाला सोडला, तर शिवसेना पिंपरी मतदार संघावर दावा करणार, हेसुद्धा प्रमुख कारण आहे. पक्षांतर्गत कुरघोडी आणि निर्णय प्रक्रियेत ‘साईडट्राईक’ केले जात असल्यामुळे बनसोडे आणि स्थानिक नेत्यांमध्ये मनभेद आहेत. राष्ट्रवादीच्या तिकीटावर २००९ आणि २०१९ मध्ये विजय मिळवल्यानंतर अनुभव असतानाही अण्णा बनसोडे यांना मंत्रीमंडळ किंवा महामंडळावर संधी दिली नाही. मध्यंतरी, गोळीबार प्रकरणात राज्यात सत्ता असताना अपेक्षीत मदत झाली नाही. त्यामुळे भाजपा आणि शिवसेना महायुतीच्या माध्यमातून सत्तेत राहण्यासाठी बनसोडे राष्ट्रवादीतून बाहेर पडतील. कारण, राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांकडून आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपामधील नाराज नगरसेविकेला ‘प्रमोट’ केले जात आहे. बनसोडे यांच्यावर निष्क्रियतेचा ठपका ठेवण्यासाठी आणि त्यांना तिकीट ‘परसेप्शन’ तयार करण्यासाठी राष्ट्रवादीतील एक गट सक्रीय आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट की केवळ सदिच्छा भेट होती. यामागे काही राजकीय असे स्पष्टीकरण आमदार बनसोडे यांच्याकडून दिले आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत बनसोडे राष्ट्रवादीतच राहतील की शिवसेनेच्या माध्यमातून पुन्हा विधानसभा जिंकतील, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## 2024 मध्ये पिंपरी मतदार संघातील चित्र बदलणार?

### आयात नको... निष्ठावंताला संधी द्या..!

**२०१९ मध्ये माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत यांना राष्ट्रवादीची उमेदवारी घोषीत झाली होती. मात्र, ऐनवेळी आमदार बनसोडे यांचा अर्ज कायम करण्यात आला. राष्ट्रवादीचे ‘कारभारी’ अजित पवार यांनी शिलवंत यांना माघार घेण्याचा आदेश दिला. आता २०२४ मध्ये शिलवंत पुन्हा विधानसभेच्या रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. मात्र, भाजपातील आयात उमेदवाराला राष्ट्रवादीकडून उमेदवारी देण्याची रणनिती राष्ट्रवादीतील स्थानिक नेत्यांनी आखली आहे. मात्र, चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीप्रमाणे “आम्हाला आयात नको, पक्षाच्या निष्ठावंत उमेदवारला संधी द्या...” असा सूर जोर धरु लागला आहे. त्यामुळे पिंपरीच्या उमेदवारीसाठी राष्ट्रवादीकडून सुलक्षणा शिलवंत ‘डार्क हॉर्स’ ठरण्याची शक्यता आहे, असा दावा राजकीय जाणकारांनी केला आहे.**

---

# खासदार श्रीरंग बारणे यांच्या माध्यमातून दिव्यांगांना विविध साहित्याचे वाटप

## केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारीता मंत्रालयाच्या माध्यमातून दिव्यांगाना मदत

। पिंपरी । महाईन्यूज

**दिव्यांगांना सशक्त करण्यासाठी केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारीता मंत्रालयाच्या माध्यमातून दिव्यांगाना दिल्या जाणाऱ्या साहित्याचे वाटप मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केले. केंद्रीय सामाजिक मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांच्या मान्यतेने खासदार श्रीरंग बारणे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम थेरगाव येथे राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत पिंपरी, चिंचवड, मावळ, कर्जत, पनवेल आणि खालापूर या सहा विधानसभा मतदारसंघात या साहित्याचे वाटप केले जाणार आहे.**



दिव्यांगांना आवश्यक साहित्याचे वाटप करण्याच्या उपक्रमाची सुरुवात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (दि. 16) थेरगाव येथे केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिव्यांग बांधवास इलेक्ट्रिक सायकल दिली. मावळ लोकसभा मतदारसंघातील 271 लाभार्थ्यांना विविध साहित्याचे वाटप केले जाणार आहे. खासदार श्रीरंग बारणे यांच्या माध्यमातून सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये दिव्यांगांसाठी आरोग्य शिबिर घेण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून गरजू दिव्यांगांना विविध साहित्याचे वाटप केले जात आहे.

लोकसभा सदस्यांना एका टर्ममध्ये एकदाच अशाप्रकारे साहित्याचे वाटप करता येते. खासदार श्रीरंग बारणे यांनी मागील टर्म मध्ये दिव्यांग बांधवांना विविध साहित्याचे वाटप केले होते. त्याचप्रमाणे आता पुन्हा साहित्याचे वाटप केले जाणार आहे. शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम खासदार श्रीरंग बारणे करीत असतात. तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये राहून त्यांची कामे मार्गी लावल्यावर त्यांचा भर असतो.

### उपक्रमाला दिव्यांगांनी उत्स्फूर्त प्रतिसाद

**दिव्यांगांच्या विविध संघटनांना विश्वासात घेऊन साहित्य वाटपाचे काम केले जात आहे. खासदार श्रीरंग बारणे यांच्या या उपक्रमाला दिव्यांगांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अंधांसाठी काठी, कर्णबधिर व्यक्तींसाठी कानाचे मशीन, व्हील चेअर, टॉयलेट भांडे आणि इतर साहित्य देण्यात आले. बुधवारी (दि. 21) पनवेल, गुरुवारी (दि. 22) कर्जत, खालापूर व उरण आणि शुक्रवारी (दि. 23) मावळ येथे हा उपक्रम राबविला जाणार आहे.**




# पादचाऱ्यांची सुरक्षा दुर्लक्षित

**महाराष्ट्रातील मुंबईची लोकसंख्या दोन कोटींपेक्षा अधिक आहे. तर मुंबईच्या रस्त्यांवर दररोज सुमारे ३४ लाख वाहने धावतात. यामुळे मुंबईची घडी विस्कटली आहे. अपघात आणि अपघाती मृत्यू हा गंभीर विषय असून त्यात पादचाऱ्यांच्या मृत्यूंचे प्रमाण चिंतेत टाकणारे आहे. पादचाऱ्यांच्या या मृत्यूंना जबाबदार कोण, स्वतः पादचारी की वाहनचालक? मोटार वाहन कायदा नेमका काय सांगतो? पोलिसांकडे या कायद्याच्या अंमलबाजवणीची जबाबदारी आहे. ती नीट पार पाडली जाते का? परिवहन विभाग, पालिका प्रशासन यांच्याकडून उपायजोजना केल्या जातात का? यावर गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.**



राज्यामध्ये लहान-मोठ्या रस्त्यांपासून महामार्गापर्यंत सुमारे तीन लाख २४ हजार किलोमीटर लांबीचे रस्ते आहेत. या रस्त्यांवर दरवर्षी साधारण ३० ते ३३ हजार अपघात घडतात. यामध्ये सरासरी १२ ते १४ हजार लोकांचा मृत्यू होतो. महामार्ग पोलिसांनी नुकतीच गेल्या चार वर्षांची आकडेवारी प्रसिद्ध केली. यामध्ये अपघातांत दहा हजारांपेक्षा अधिक पादचाऱ्यांचा मृत्यू झाला असून बारा हजारांपेक्षा अधिक पादचारी गंभीर जखमी झाले आहेत. देशातील अपघात आणि अपघाती मृत्यूंमध्ये २५ ते ३० टक्के प्रमाण हे पादचाऱ्यांच्या मृत्यूचे असते. कोणतेही वाहन न वापरता केवळ रस्त्यावर चालताना खबरदारी न घेतल्याने आणि चालकांच्या हलगर्जीमुळे पादचाऱ्यांचे इतके नाहक बळी जाणे, हे चिंताजनक आहे. मुंबईच्या रस्त्यांवर दररोज सुमारे ३४ लाख वाहने धावतात. आंतरराष्ट्रीय मानकांनुसार एक किलोमीटर रस्त्यावर जास्तीत जास्त साडेतीनशे वाहने असतील, तर वाहतूक सुरळीत राहील. मुंबईच्या रस्त्यावर क्षमतेपेक्षा तिप्पट म्हणजे एक किलोमीटर अंतरावर सुमारे साडेनऊशे वाहनांचा ताण आहे. वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे कोंडी तर होतेच, पण त्याचबरोबर पार्किंग, अपघात अशाही समस्या निर्माण होतात. मुंबईच्या दृष्टिकोनातून विचार करायचा म्हटले, तर पादचाऱ्यांचा जीव धोक्यात आहे. त्यांना चालण्यासाठी फुटपाथच उपलब्ध नाहीत. दुसरीकडे धावणाऱ्या या शहरात प्रत्येकाला घाई असते, पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्याची, तर वाहनचालकांना लवकर पोहोचण्याची. अशी लगबग आणि निष्काळजी असेल तर अपघात होणारच!

वाहतूक तज्ज्ञांची यावर वेगवेगळी मते आहेत. अरुंद फुटपाथ, त्यावर अतिक्रमणे, उंचसखल भाग यामुळे मुंबईतील पादचारी फुटपाथचा वापर करतच नाहीत. मुंबईत थुंकणारा माणूस सिंगापूरमध्ये जाऊन सार्वजनिक ठिकाणी थुंकत नाही, कारण तिकडे दंड आणि फटके दोन्ही मिळतात. असेच चित्र वाहतूक नियमांच्या बाबतीत पाहायचे असेल, तर साम-दाम-दंड याचा वापर केल्याशिवाय ना पादचाऱ्यांना शिस्त लागणार, ना वाहनचालकांना, असे भारत गोठसकर सांगतात. प्लेगच्या महाभयंकर साथीनंतर ब्रिटिशांनी मुंबईत 'सिटी ऑफ बॉम्बे इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट' म्हणजेच बीआयटीची स्थापना केली. याच बीआयटीने दादरची हिंदू कॉलनी, शिवाजी पार्कचा परिसर, सायनचा काही भाग, खार यांसारखे परिसर नियोजनपूर्ण उभे केले. या ठिकाणच्या इमारती, रस्ते, फुटपाथ हे सर्व अगदी नियोजनबद्ध असल्याचे दिसते. तर याउलट चित्र गिरगाव, डोंगरी, भेंडीबाजार परिसरात दिसून येते. कसेही रस्ते, फुटपाथचा पत्ता नाही, कुणीही कुठेही अतिक्रमण केले आहे, चुकीच्या ठिकाणी पार्किंग, नुसती बजबजपुरी वाटावी, असा येथील माहोल असतो. त्याचे कारण म्हणजे नियोजनाचा असलेला अभाव, असेही त्यांनी नमूद केले. चांगले रस्ते द्या, फुटपाथ चालण्यायोग्य करा आणि त्यानंतरही त्याचा कुणी वापर करीत नसेल, तर त्यांच्याकडून दंड वसूल करा. नियोजन केले, तर सर्व काही शक्य आहे, असेही ते म्हणाले. आता पोलिओचेच पाहा. अभिनेता अमिताभ बच्चन यांचा जाहिरातीमध्ये समावेश करण्यात आला. पोलिओच्या जाहिरातीत अमिताभ दिसायला लागल्यापासून पोलिओ डोस घेणाऱ्यांच्या प्रमाणात घसघशीत वाढ झाली. अपघात, वाहतुकीचे नियम याबाबत जनजागृती करण्यासाठी सरकारकडे आता तर समाजमाध्यमेही उपलब्ध आहेत. एकीकडे सोयीसुविधा आणि कायद्याची अंमलबजावणी करताना दुसरीकडे अशा प्रकारची जनजागृती केली तर त्याचे निश्चित सकारात्मक परिणाम दिसतील.

'श्रीमंत देशाचा गरीब राजा' अशा शब्दांत निवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त रोहिदास दुसार पादचाऱ्यांचा उल्लेख करतात. मुळात मोटार वाहन कायदाच पादचाऱ्यांना त्यांच्या सुरक्षेला डोळ्यासमोर ठेवून तयार करण्यात आला आहे. युरोपमध्ये पादचारी मृत्यूचे प्रमाण शून्य टक्के आहे. कारण ते वाहन आणि पादचारी यांना कधीच समोरासमोर येऊ देत नाहीत. आपण युरोपचे अनुकरण करीत स्कायवॉकची संकल्पना आणली. परंतु या स्कायवॉकना सरकते जिने किंवा लिफ्टची व्यवस्था नाही आणि कुठे दिसलीच तर ती बंद. तेच चित्र भुयारी मार्गांमध्येही दिसते. त्यामुळे रस्त्यावर चालणारा पादचारी विनाकारण कशासाठी जिने चढायचे, असाच विचार करतो, असे दुसार म्हणाले. कायदा पादचाऱ्यांसाठी आणि सेवासुविधा श्रीमंतांसाठी असे काहीसे चित्र आपल्याकडे आहे. रस्ता ओलांडण्यासाठी पादचाऱ्यांना केवळ आठ ते १० सेकंदाचा वेळ आणि वाहनांसाठी हिरवा सिग्नल १२० सेकंदांचा.

## संपादकीय »

### भ्रष्टाचाराचा 'टक्का'

***लाचखोरीच्या प्रकरणात अडकलेल्या शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची खुली चौकशी करा, असे पत्र लिहिण्याची वेळ खुद्द शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांच्यावर यावी, यातूनच नवी पिढी घडविणारे शिक्षणासारखे खाते लाचखोरी आणि गैरप्रकारांनी किती बरबटले आहे, याची कल्पना यावी.***

शिक्षण खात्यातील भ्रष्टाचाराच्या सुरस कहाण्या चर्चेत असून गेल्या काही काळात नाशिक, सांगली, पुणे आणि सोलापूर येथील अधिकारी व कर्मचारी 'एसीबी'च्या सापळ्यात सापडले आहेत. शिक्षणाधिकारीही त्याला अपवाद नाहीत. त्यातील अनेकांच्या अवैध संपत्तीची 'कोटीच्या कोटी उड्डाणे' समोर आली आहेत. ३६ जणांची चौकशी सुरू आहे. काही दिवसांपूर्वी लाचखोरीच्या प्रकरणांची वार्षिक आकडेवारी जाहीर झाली. त्यामध्ये महसूल आणि पोलिसांबरोबर शिक्षण खात्यातील प्रकरणांची संख्याही मोठी आहे. त्यात शाळांना मान्यता, 'शालार्थ' मार्गी लावणे, मुख्याध्यापक नियुक्ती, वैद्यकीय बिलांना मान्यता, नोकरी लावून देणे किंवा संभाव्य कारवाईतून बचाव अशा कामांसाठी लाच मागण्यात येते.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, "आज बुवांनी वैयक्तिक देवपूजेबरोबरच विश्वधर्माचे पूजन केले पाहिजे. 'जे का रंजले गांजले। त्यासि म्हणे जो आपुले।। साधु तोचि ओळखावा। देव तेथेचि जाणावा।।' हे वचन अगदी सत्य आहे. आज रंजल्या, गांजल्याची सेवा करण्याकरिता संप्रदाय, पंथ व संस्था याविषयींचा दुरभिमान टाकून एकाच अधिष्ठानाखाली यायला हवे.**

## तीर्थक्षेत्रे ज्ञानदानाची मंदिरे व्हावीत!



पूर्वीच्या काळी विभिन्न पंथ व संप्रदाय होते पण त्यांचे कार्य एकमेकांस पोषक असेच होते. शरीराचे अवयव भिन्न असले तरी ते एकोप्याने कार्य करतात व शरीराचे पोषण होते, तद्वतच विविध संस्थांनी समाजाचे पोषण केले पाहिजे."

"हा जातीयतेला मूठमाती देण्याचा काळ आहे. राष्ट्रक्रांती व धर्मक्रांतीच हा काळ नाही तर निसर्गातही क्रांती घडण्याचा काळ आहे. अशा वेळी आम्ही सर्वत्र पावित्र्याचे, त्यागाचे, चारित्र्याचे, कलाकुशलतेचे व सामुदायिक भावनेचे वातावरण निर्माण केले पाहिजे. त्याकरिता क्वचित संघर्ष करावा लागला तरी हरकत नाही. संघर्षांशिवाय नवीन राष्ट्र निर्माण होणार नाही. घातक रूढींना मूठमाती द्यावी लागेल. स्वार्थाला आळा घालावा लागेल."

तीर्थक्षेत्राला कार्यक्षम करण्याची गरज अधोरेखित करताना महाराज म्हणतात, "धर्म कोणताही असो, आज बहुतांश तीर्थक्षेत्रे भ्रष्ट झाली आहेत. पूर्वी ती धर्म, ज्ञान-प्रसाराची स्थाने होती. आज ती व्यापारी पेठा, बुवांचे राजवाडे व देवांची बंदिस्थाने होऊन बसली आहेत. ती पुनश्च ज्ञानदानाची पवित्र विद्यालये व सदाचारांचे पाठ घेण्याची स्थाने बनली पाहिजेत. पूर्वी गुरुकुले होती. त्यातून जे विद्यार्थी तयार होत ते संसार करून परमार्थ साधत. वैयक्तिक हितसाधन समाजहिताचीच एक भाग मानत. त्यामुळे समाजात व राष्ट्रात नैतिकतेबरोबरच वैभवही झळकत होते. आज राजकारणाची धर्मकारणाशी फारकत होऊ पाहात आहे. वास्तविक दोहोंची सांगड घालण्याची आवश्यकता आहे. धर्मगुरूंनी राष्ट्राच्या उन्नतीच्या आड येऊ नये व राजनीतीज्ञांनी धर्माची उपेक्षा करू नये." "आज राष्ट्रवीरांबरोबरच धर्मवीरांचीही गरज आहे. राष्ट्राची ज्या ज्या वेळी सर्वांगीण उन्नती झाली त्या त्या वेळी राष्ट्रपुरुष व संतमहात्म्यांनी एकोप्याने कार्य केल्याचे आढळेल. धर्म राष्ट्राच्या आड येत असेल तर तो सद्धर्म नव्हे. सद्धर्म हा राष्ट्रीयतेचा पाया होय. त्यावरच राष्ट्रीयतेचे मंदिर उभारले पाहिजे. तरच ते चिरकालिक ठरेल. आज देवभक्ती आणि देशभक्ती हातात हात घालून चालताना दिसली पाहिजे.

## ।। अभंगवाणी ।।



अडकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मान्सूनचं आगमन रखडलं!

## » शेतकऱ्यांना आवाहन: जुलैमध्ये पेरण्या करण्याचा सल्ला

। नाशिक । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यावर पाऊस लांबणीवर पडण्याचे नैसर्गिक अरिष्ट घोंघावते आहे. अशा परिस्थितीत पेरण्या केल्यास त्या व्यर्थ जाऊ शकतात. शेतकऱ्यांनी जूनमध्येच पेरण्या उरकण्याची घाई करू नये यासाठी दक्षता घ्या. त्यांना जुलैमध्ये पेरण्या करण्याबाबत अवगत करा, असे निर्देश राज्याचे मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांनी सोमवारी जिल्हा प्रशासनाला दिले. पावसाअभावी पेरण्यांचा खोळंबा होणार असून, त्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.**



गेल्या काही वर्षांपासून पावसाचे वेळापत्रक बिघडले आहे. अवकाळी पाऊस तर कधीही शेतीवर तुटून पडतो. अवेळी झालेल्या गारपीटीने शेतपिकांची नासाडी केली. झालेल्या नुकसानीतून शेतकरी अजून सावरू शकलेला नाही. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागतात. पाऊस केव्हा पडेल आणि शेतीची कामे कशी मार्गी लावता येतील याचे नियोजन सुरू होते. १ जूनपासून पावसाचा हंगाम सुरू झाला. त्यामुळे शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत. ढगाळ वातावरणामुळे आज ना उद्या पाऊस पडेल अशी आशा शेतकऱ्यांना वाटू लागते. परंतु, प्रत्यक्षात पाऊस पडत नाही. राज्यावर अलनिनो वादळाचा प्रभाव राहणार असून, त्यामुळे पाऊस लांबणीवर पडणार असल्याचा अंदाज काही महिन्यांपूर्वीच हवामान विभागाने वर्तविला होता.

जुलैपर्यंत पावसाचे प्रमाण कमीच राहणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात आल्याने जिल्हा प्रशासन पाणी उपलब्धतेचे नियोजन करू लागले.

जूनच्या पहिल्या तीन आठवड्यांत जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमीच राहिले आहे. प्रत्येक तालुक्यात पावसाचा कमी-अधिक प्रमाणात शिडकावा झाला असला, तरी त्या भरवशावर शेतकऱ्यांनी पेरण्या केल्यास दुबार पेरण्या करण्याची वेळ त्यांच्यावर येऊ शकते. या पार्श्वभूमीवर मुख्य सचिव श्रीवास्तव यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे आढावा बैठक घेतली.

अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ, कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांसह ग्रामीण पोलिसांचे अधिकारीही यावेळी उपस्थित होते. जिल्ह्यात १ जूनपासून आतापर्यंत झालेल्या पावसाचा आढावा प्रारंभी घेण्यात आला. जून महिन्यात जिल्ह्यात एकूण सरासरीच्या १७.९ टक्के पाऊस झाला आहे.

### शेतकऱ्यांची मेहनतदेखील वाया जाईल

**»राष्ट्र जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पावसाची प्रतीक्षा करावी लागण्याची शक्यता असून, त्यानंतरच पेरण्या करण्याच्या सूचना शेतकऱ्यांना द्याव्यात, असे निर्देश जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत. पेरण्या लवकर केल्या आणि पाऊस पडला नाही, तर दुबार पेरणी करावी लागू शकते. त्यामुळे बियाणे आणि शेतकऱ्यांची मेहनतदेखील वाया जाईल. म्हणूनच पावसाचा एकंदरीत अंदाज पाहता जुलैमध्ये पेरण्या कराव्यात, असे शेतकऱ्यांना आवाहन आहे, असं नाशिकचे जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे म्हणाले.**

---

## ठाकरे गटाकडील विरोधी पक्षनेतेपद धोक्यात

। मुंबई । महाईन्यूज

विधान परिषदेतील ठाकरे गटाच्या आमदार मनीषा कायंदे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्यामुळे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे पद धोक्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. कायदे यांच्या पक्षांतरामुळे विधान परिषदेतील ठाकरे गटातील आमदारांची संख्या कमी झाली आहे. मात्र, महाविकास आघाडीतील एकजूट अभेद्य राखण्यासाठी विरोधी पक्षनेतेपदावर दावा करण्याची शक्यता नसल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसमधील सूत्रांचे म्हणणे आहे.

मुख्यमंत्र्यांच्या शिवसेनेत विदर्भातील विप्लव बजोरिया हे विधान परिषदेतील एकमेव आमदार होते. मनीषा कायंदे यांनी रविवारी शिवसेनेत प्रवेश केल्यामुळे परिषदेतील ठाकरे गटाचे संख्याबळ ११ वरून नऊपर्यंत खाली आले. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हेसुद्धा विधान परिषदेचे सदस्य आहेत. शिवाय, माजी परिवहनमंत्री अनिल परब हे ठाकरे गटाचे प्रतोद आहेत. मराठवाड्यातील अंबादास दानवे विरोधी पक्षनेते आहेत. सध्या देशभरातील वातावरण पाहता ठाकरे गटाचे हे पद काढून घेण्याचा दोन्ही काँग्रेसचे वरिष्ठ नेते विचार करणार नाहीत, असे मानले जात आहे.

### 'निर्णय वरिष्ठ नेत्यांवर'

'महाविकास आघाडीत एकजूट राहावी, यासाठी तिन्ही पक्ष आपापल्या पद्धतीने प्रयत्न करीत आहेत. आताचे सरकार सत्तेवर आल्यानंतर आमची संख्या जास्त असल्यामुळे आम्हाला विरोधी पक्षनेतेपद मिळाले. वरच्या सभागृहामध्ये शिवसेनेला विरोधी पक्षनेतेपद मिळाले. आता नवी संख्या किती आहे यावर वरिष्ठ नेते निर्णय घेतील,' असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी या प्रश्नावर स्पष्ट केले. 'तुम्ही ही गोष्ट लक्षात आणून दिल्यानंतर विचार निश्चित करू,' असे मिश्कील भाष्यही अजित पवार यांनी केले. तथापि, 'विरोधी पक्षनेते बदलण्याचा कोणताही विचार नाही, हा प्रश्नच उद्भवत नाही,' असे 'राष्ट्रवादी'च्या एका नेत्याने सांगितले.

# सगळे खोके कुठे गेले हे एक दिवस जनतेसमोर यईल!

## » CM शिंदेंचा उद्धव ठाकरेंना गर्भित इशारा

। अकोला ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शिवसेनेचा वर्धापन दिन (शिंदे गट) मुंबईत नेस्को सेंटरमध्ये झाला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे आण ठाकरे गटातील नेत्यांच्या आरोपांचा आणि टीकांचा समाचार घेतला. तेच टोमणे, तेच आरोप, दुसरं काहीच नाही. तीच कॅसेट किमान स्क्रिप्टरायटर तर बदलवा. पण आम्ही आरोपांना उत्तर कामाने देणार, हेच बाळासाहेबांनी आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांनी आम्हाला शिकवलं आहे, असं म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना जोरदार प्रत्युत्तर दिलं.**



शिवसैनिकांच्या आणि नेत्यांच्या रक्तातून, घामातून, कष्टातून शिवसेना मोठी झाली. टपरीवाला, चहावाला, रिक्षावाला आणि भाजीवाला यांनी शिवसेना मोठी केली. यांना तुम्ही हिणवातय. पण यांना घेऊनच बाळासाहेबांनी शिवसेना मोठी केली. फाटक्या लोकांना घेऊन शिवसेना मोठी केली. त्यांनाच हिणवताय, हा बाळासाहेबांचा अवमान आहे. तुम्ही कुठे होता? किती केस झाल्या तुमच्यावर? असा सवाल म्हणत एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना केला. मराठी माणसाच्या न्याय हक्कसाठी आणि हिंदुत्वाच्या रक्षणासाठी शिवसेनाप्रमुखांनी शिवसेना स्थापन केली. आज शिवसेनेला ५७ वर्ष होत आहेत. गेलं वर्ष शिवसेनेतल्या इतिहासातलं ऐतिहासिक वर्ष होतं. गेल्या वर्षी २० तारखेला क्रांतीला सुरुवात केली. अनेकांनी आपल्या उठावाची दखल घेतली. आणि ३० तारखेला शिवसेना-भाजप युतीची सत्ता स्थापन केली.

### अन् एकनाथ शिंदे भाऊक झाले...

**»एकनाथ शिंदेने कर्ज काढून निवडणुका लढवल्या आहेत. कार्यकर्त्यांना निवडून आणलं आहे. मिळेल ते काम केलं. कष्ट केलं. सीमा लढ्यात वयाच्या २१वर्षी बेळगावच्या तुरुंगात ४० दिवस होतो. अनेकदा तुरुंगात गेलो. अनेक शिवसैनिकही गेले. व्यासपीठावर बसलेल्या नेत्यांनीही तेच केलंय. म्हणून शिवसेना मोठी झाली आणि पुढे गेली. शाखाप्रमुख ते मुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचलो. बाळासाहेब आणि दिघे साहेबांच्या आशीर्वादाने पोहोचलो, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. सभा पूर्ण करून आलो आणि आईचं अंत्यदर्शन मी हॉस्पिटलमध्ये घेतलं. काय मिळवलं आम्ही? ही काय चूक केली? अशा घटना आणि प्रसंग अनेक नेत्यांच्या जीवनात घडलेत. आपल्या आधारामुळे बाळासाहेब आणि दिघे साहेबांच्या आशीर्वादामुळे हा एकनाथ शिंदे तुमच्यासमोर उभा आहे, असं म्हणत मुख्यमंत्री शिंदे यावेळी भावुक झालेले दिसले.**

# सचिन तेंडुलकरच्या लेकीच्या स्टाईलची सोशल मीडियावर चर्चा



भारतीय क्रिकेट विश्वातील मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरची लाडकी लेक सारा तेंडुलकरने मॉडलिंग क्षेत्रात पदार्पण केले आहे. सारा सोशल मीडियावरही खूप सक्रिय असते.

साराचे सोशल मीडियावर लाखो चाहते आहेत. सारा तेंडुलकरने मॉडलिंग क्षेत्रात पदार्पण केल्यापासून तिचे अनेक सुंदर फोटो शेअर करत असते. साराच्या फोटोंवर चाहते अनेक कमेंट्स करतात.

भारतीय क्रिकेट विश्वातील मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या लेक्याच्या सौंदर्याचे लाखो चाहते आहेत.

# कुणी तरी येणार गं! 'ये जवानी है दिवानी' फेम अभिनेत्रीने दिली गुडन्यूज



अयान मुखर्जीचा सुपरहिट चित्रपट 'ये जवानी है दिवानी' आणि 'यारियां'मध्ये महत्वाच्या भूमिका साकारणारी एल्विन शर्मा हिने नुकतीच तिच्या गरोदरपणाची घोषणा केली आहे. बॉलिवूड अभिनेत्री एव्हलिन शर्मांने लग्नानंतर इंडस्ट्रीतुन काढता पाय घेतला. ती शेवटची 'साहो' आणि 'एक्स-रे' या चित्रपटात दिसली होती.

ती एका मुलीची आई असून आता दुसऱ्या मुलाला जन्म देणार आहे. एव्हलिनने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर तिच्या बेबी बंपचे फोटो शेअर करून आनंदाची बातमी चाहत्यांसोबत शेअर केली आहे.

एल्विनने तिच्या इंस्टाग्रामवर पोस्ट करत याबद्दल माहिती दिली. एव्हलिन शर्मा काळ्या स्पोर्ट्स ब्रा आणि जॉगर्समध्ये तिचा फोटो शेअर केला. या फोटोत ती तिचा बेबी बंप फ्लॉंट करताना दिसत आहे.या फोटोसह, अभिनेत्रीने लिहिले आहे- 'मी आता तुला माझ्या हातात धरण्यासाठी उत्सुक आहे!! बेबी #2 ऑन द वे!'२०१९ मध्ये एल्विन शर्मा शेवटचा चित्रपट करत केला आणि ती मोठ्या पडद्यावरुन गायब झाली. मात्र ती सोशल मीडियावर पूर्णपणे सक्रिय आहे. ती तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर स्वतःचे आणि तिच्या पतीचे आणि मुलीचे फोटो शेअर करून चर्चेत असते. एव्हलिनने मे २०२१ मध्ये इंडो-ऑस्ट्रेलियन डेंटल सर्जन आणि उद्योगपती तुषान भिंडीशी लग्न केले होते.

# ऐश्वर्या रायने थकवला 22 हजारांचा टॅक्स, मिळाली नोटीस

अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन मोठ्या अडचणीत सापडली आहे. ऐश्वर्याला थकबाकीसंदर्भात एक नोटीस पाठवण्यात आली आहे. ऐश्वर्याला सिन्नर तहसीलदार कार्यालयाने नोटीस बजावली आहे. ऐश्वर्याने २२ हजारांचा टॅक्स थकवला आहे. त्यासंदर्भात तिला ही नोटीस बजावण्यात आली आहे.


नाशिक जिल्ह्यातील सिन्नरमधील आडवाडी गावात पवन ऊर्जा कंपनीत ऐश्वर्याची गुंतवणूक आहे. आयकर बचत करण्यासाठी सुजलोन पवन ऊर्जा निर्मिती कंपनीत अनेक कलाकारांनी गुंतवणूक केल्या आहेत. ही कंपनी ऐश्वर्या राय बच्चन हिच्या जमीनीवर आहे. सिन्नरमधील ठाणगावजवळ आडवाडी भागात ऐश्वर्याची सुमारे 1 हेक्टर 22 आर जमीन आहे. याच जमिनीचं एक वर्षाचं कर ऐश्वर्याने थकवल्याची माहिती समोर येत आहे. ऐश्वर्यासोबतच इतरही 1200 मालमत्ता धारकांना कर थकवल्याप्रकरणी नोटीस बजावण्यात आली आहे.

मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत कर वसुलीचं उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी महसूल विभागाकडून ही कारवाई करण्यात आली आहे.थकबाकीदारांत बिंदू वायू ऊर्जा लिमिटेड, एअर कंट्रोल प्रा. लि., मेटकोन इंडिया प्रा. लि., छोटाभाई जेठाभाई पटेल आणि कंपनी, राजस्थान गम प्रा. लिमिटेड, एल बी कुंजीर इंजिनिअर, एस. के. शिवराज, आयटीसी मराठा लिमिटेड, हॉटेल लीला व्हेंचर लिमिटेड, बलवीर रिसॉर्ट प्रा. लि., कुकरेजा डेव्हलपमेंट कार्पोरेशन, ओपी एंटरप्रायझेस कंपनी गुजरात, रामा हॅंडिक्राफ्ट, अल्ग्रो व्हेंचर्स लिमिटेड अशा कंपन्यांचा समावेश आहे.ऐश्वर्या राय-बच्चन सह तालुक्यातील तब्बल १२०० अकृषक मालमत्ताधारकांना तहसीलदार एकनाथ बंगाळे यांच्या स्वाक्षरीनिशी थकबाकीच्या विवरणपत्रासह नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत. अकृषक करापोटी सिन्नर तहसील कार्यालयाला १ कोटी ११ लाखांचा वार्षिक महसूल अपेक्षित आहे. त्यापैकी ६५ लाखांची रक्कम थकीत असून मार्च अखेर ती वसूल करण्याचे उद्दिष्ट आहे.



# जान्हवी विषयी असं कसं काय बोलू शकतो अर्जुन कपूर?

श्रीदेवी आणि बोनी कपूर यांची मुलगी जान्हवी कपूर सध्या आपल्या अभिनयापेक्षा अधिक बोल्डनेसमुळे चर्चेत आलेली पहायला मिळाली. जान्हवी आपले एक एक असे हॉट फोटो शेअर करते की ते पाहून इंटनेटचा पारा वाढताना दिसतो.काही दिवसांपूर्वीच जान्हवी कपूर विषयी तिचा सावत्र भाऊ अभिनेता अर्जुन कपूरनं अशी काही विधानं केली आहेत जी जोरदार व्हायरल होताना दिसत आहेत. एवढंच नाही तर अर्जुन कपूरने आपल्या या मुलाखतीत लेडी लव्ह मलायका अरोरा संदर्भातही अशा काही गोष्टी बोलून दाखवल्यात की आपण शॉक व्हाल अर्जुन कपूरनं एका मुलाखतीत अगदी मनमोकळा संवाद साधत आपल्या वैयक्तिक आयुष्याविषयी देखील मोठे खुलासे केले आहेत. अर्जुन कपूरनं बहिण जान्हवी कपूर विषयी बोलताना म्हटलं आहे की- "जान्हवी कपूर खूपच इनसिक्योर आहे आणि कामाची भुकेलेली आहे. तिला आपल्या क्षमतेवर अजिबात विश्वास नाही.





# World Cup सुरु होण्यापूर्वी पाकिस्तानने भारताला डिवचलं!

## गुजरत सोडून कुठेही सामना खेळवा, पाकिस्तानने बीसीसीआयला कळवले

। नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**वर्ल्डवनडे विश्वचषकाची सध्याच्या घडीला जोरदार चर्चा सुरु आहे. पण हा विश्वचषक सुरु होण्यापूर्वी आता पाकिस्तानने माइंड गेम खेळायला सुरुवात केली आहे. कारण आता फक्त एका वाक्यात पाकिस्तानने भारताला डिवचल्याचे पाहायला मिळाले आहे.**



पाकिस्तानने सुरुवातीला आपण भारतात विश्वचषक खेळण्यासाठी येणार नसल्याचे स्पष्ट केले होते. पण त्यानंतर बीसीसीआयने आशिया चषकाच्या आयोजनाच्या मुद्द्यावरून अशी काही चाल खेळली की आता पाकिस्तान भारतामध्ये खेळायला तयार झाले आहे. पण त्यांनी आता भारताच्या एका गोष्टीला विरोध कायम ठेवला आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना हा गुजरातमध्ये खेळवण्यात यावा, असे बीसीसीआयला वाटत आहे. पण पाकिस्तानने मात्र या गोष्टीला विरोध केला आहे. गुजरातसोडून कुठेही सामना खेळवा, असे पाकिस्तानने बीसीसीआयला कळवले आहे. दुसरीकडे मात्र पाकिस्तानने हा विश्वचषक सुरु होण्यापूर्वी माइंड गेम खेळायला सुरुवात केली आहे. पाकिस्तानच्या मोहम्मद रिझवानने आता फक्त एका वाक्यात भारतीय संघाला चांगलेच डिवचले आहे.

रिझवानने सांगितले की, " भारताला पराभूत करणे हे आम्हाला विश्वचषक जिंकण्यासारखे नक्कीच नाही. कारण विश्वचषक जिंकणे हे आमचे मुख्य लक्ष्य आहे. कारण आम्हाला कोणत्या एका देशाला पराभूत करून आनंद मिळवायचा नाही, तर आम्हाला विश्वचषक जिंकायचा आहे आणि त्यासाठी आम्ही जोरदार तयारी करत आहोत. विश्वचषकात बरेच देश असतात, तसाच आम्हाला भारतही आहे. त्यामुळे भारत हा आम्हाला अन्य देशांसारखाच आहे, कारण आमचे ध्येय हे विश्वचषकाचे आहे. त्यामुळे आम्ही विश्वचषक कसा जिंकू शकतो, याचाच विचार सध्याच्या घडीला करत आहोत." वनडे विश्वचषकात आतापर्यंत पाकिस्तानला एकदाही भारताला पराभूत करता आलेले नाही. त्यामुळे त्यांना भारतावर विजय मिळवणे म्हणजे इतिहास रचण्यासारखे असेल. पण पाकिस्तानला फक्त भारतावर विजय मिळवायचा नाही तर त्यांना विश्वचषक जिंकायचा आहे. त्यामुळे त्यांनी या विश्वचषकात भारताला जास्त महत्व दिलेले पाहायला मिळत नाही. पण विश्वचषकातील हा सर्वात मोठा सामना असेल आणि तो कोण जिंकतो, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असेल.

### पाकिस्तान चेन्नईमध्ये खेळायला का घाबरते

पाकिस्तान भारतात विश्वचषक खेळण्यासाठी तयार झाली आहे. पण चेन्नईमध्ये खेळण्यासाठी आता पाकिस्तानचा संघ घाबरत असल्याचे समोर आले आहे. पाकिस्तानना चेन्नईमध्ये आपला सामना का खेळायचा नाही, याचे कारणही आता समोर आले आहे. आतापर्यंत पाकिस्तानचा संघ हा गुजरातच्या सामन्याला विरोध करत असल्याचे पाहायला मिळत होते. पण आता त्यांनी पाकिस्तानचा सामान चेन्नईत खेळवला जाऊ नये, असे म्हटले आहे. पाकिस्तानचा संघ हा चेन्नईत खेळायला घाबरत असल्याचे आता समोर आले आहे. चेन्नईत पाकिस्तानला सामना का खेळायचा नाही, याबाबतचे एकमेव कारण आता समोर आले आहे. विश्वचषकाचे वेळापत्रक बनवण्यात आले आहे, पण त्याला अजून आयसीसीची मंजूरी मिळालेली नाही. पण लवकरच या वेळापत्रकाला मंजूरी मिळणार आहे. पण त्यापूर्वीच आता पाकिस्तानच्या संघाने आपला अफगाणिस्तानबरोबरचा सामना हा चेन्नईत होऊन नये, असे म्हटले आहे. कारण भारताने पाकिस्तानचा अफगाणिस्तानबरोबरचा सामना हा चेन्नईत आयोजित केला आहे. पण पाकिस्तानला हा सामना चेन्नईत व्हावा, असे वाटत नाही. पाकिस्तानला चेन्नईत हा सामना का खेळायचा नाही, याचे कारणही समोर आले आहे. या गोष्टीचे एकमेव कारण आहे खेळपट्टी. चेन्नईची खेळपट्टी ही फिरकी गोलंदाजीला पोषक समजली जाते. अफगाणिस्तानकडे आता रशिद खान आणि नीर अहमदसारखे अव्वल दर्जाचे फिरकीपटू आहेत.

---

## तिरंदाजी वर्ल्ड कपमध्ये अभिषेकने रचला इतिहास, अमेरिकेवर मात करत सुवर्णपदक

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



अभिषेकचे वर्ल्ड कपमधील हे तिसरे वैयक्तिक सुवर्णपदक ठरले. मात्र, २०२१मधील पॅरिस स्पर्धेनंतर प्रथमच त्याला सुवर्णपदकाचा वेध घेता आला. याआधी २०१५च्या पोलंड वर्ल्ड कपमध्ये अभिषेकने सुवर्णपदक जिंकले होते. वर्ल्ड कपमध्ये त्याने वैयक्तिक गटात दोन रौप्य आणि एक ब्राँझपदकही मिळवले आहे. भारताने आतापर्यंत एक सुवर्ण आणि तीन ब्राँझपदकाची कमाई केली.

मेडेलिन (कोलंबिया) : भारताच्या अभिषेक वर्माने तिरंदाजी वर्ल्ड कपच्या तिसऱ्या टप्प्यात पुरुषांच्या कम्पाउंड प्रकारात सुवर्णपदकाची कमाई केली. ३३ वर्षीय अभिषेकने अंतिम फेरीत अमेरिकेच्या जेम्स लुत्झवर १४८-१४६ अशी मात केली. अंतिम फेरीत पहिल्या सेटमध्ये अभिषेक आणि जेम्सने प्रत्येकी ३० गुण मिळवले, तर दुसऱ्या सेटमध्ये दोघांनी प्रत्येकी २९ गुण मिळवले. तिसऱ्या सेटमध्ये जेम्सने ३० गुण मिळवून एका गुणाची आघाडी मिळवली. चौथ्या सेटमध्ये अभिषेकने ३०, तर जेम्सने २८ गुण मिळवले. त्यामुळे अभिषेककडे जेम्सविरुद्ध ११८-११७ अशी एका गुणाची आघाडी होती. त्यामुळे अखेरच्या सेटमधील तीन प्रयत्नांत चुरस वाढली होती.

## आशिया कपमधून मिळालेला एक रुपया घेत नाही BCCI!

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**२०२३चा आशिया कप कुठे होणार हा वाद आता संपुष्टात आला आहे. आशिया कप वनडेमधील काही सामने पाकिस्तानमध्ये तर काही श्रीलंकेत होणार आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील मॅच श्रीलंकेत होतील. भारताने पाकिस्तानमध्ये खेळणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.**




भारताने आतापर्यंत सर्वाधिक ७ वेळा आशिया कप जिंकला आहे. ही गोष्ट फार कमी लोकांना माहिती आहे की, आशिया कपमधून मिळणारे पैसे कधीच बीसीसीआय स्वत:कडे ठेवत नाही.

माजी क्रिकेटपटू आणि आकाश चोप्राने त्याच्या यूट्यूब चॅनलवर याचा खुलासा खेला आहे. तो म्हणतो की, अखेर आशिया कपचा वाद संपला. पण या निमित्ताने एक गोष्ट मी तुम्हाला सांगू इच्छितो. जेव्हापासून आशिया कपला सुरुवात झाली आहे तेव्हापासून या स्पर्धेच्या इतिहासात याचे उत्पन्न ब्रॉडकास्टमधून येते. पण बीसीसीआयने यातील एकही रुपया कधी घेतला नाही. बीसीसीआय एसीसीचा पैसा घेत देखील नाही. आता तुम्हाला देखील प्रश्न पडला असेल की, इतके मोठे उत्पन्न बीसीसीआय का घेत नाही आणि घेत नाही तर हा पैसा जातो तरी कोणाला? आशिया कपमध्ये जेव्हा बीसीसीआयच्या वाटेला काही रक्कम येते तेव्हा ती रक्कम एसीसीला दिली जाते. जेणेकरून ज्या देशात क्रिकेटच्या विकासासाठी निधीची गरज असेल तेथे वापर करता येईल. बीसीसीआय आशिया कपमधील कोणताही पैसा स्वत:साठी घेत नाही, असे म्हणत आकाश चोप्रांनी सांगितले की, बीसीसीआयला छोटी रक्कम नको असते. त्यांच्याकडे आधीच भरपूर पैसे आहेत. पण अन्य कोणताही देश असे करत नाही. श्रीलंका असो वा पाकिस्तान सर्व देश त्यांना मिळालेले पैसे घेतात.